# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- अभिलेख धारिका क्रं. १४८/बाजार समिती/उमेदवार यादी/मराठी/ 1३९२/ /सन२०१८ दिनांक१८/५/२०१८.

**वाचावे :-**१. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.
२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २९ (१) व (२) मधील तरतुद.
३. मराठी भाषा विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक मभावा-२०१८/प्र.क्र. ४७/भाषा-२,दिनांक ७.५.२०१८.
४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) मधील तरतुद.

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील बाजार समिती यांच्या सर्व निवडणूकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राज्यातील निवडणूकीस पात्र बाजार समितींची निवडणूक घेणेची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २९ मधील तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मराठीत यादी तयार करील आणि नमुना ८ मध्ये सुचना फलकावर प्रसिध्द करील. त्याचप्रमाणे सदर नावे वर्णानुक्रमानुसार (alphabetical order) असतील अशी तरतुद आहे. मात्र सदर नियमामध्ये इंग्रजी वर्णमालेनुसार कि मराठी वर्णमालेनुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी प्रसिध्द करावी या बाबतची स्पष्टता या नियमामध्ये नाही.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७, इंग्रजी आवृती मधील नमुना ८ मध्ये सुध्दा मराठी वर्णमालेचा कि इंग्रजी वर्णमालेचा वापर करावा या बाबत स्पष्ट तरतुद नाही. तथापि, मराठी आवृती मधील नमुना ८ मधील टीप मध्ये इंग्रजी वर्णमालेप्रमाणे यादी करणे बाबत तरतुद आहे. त्यामुळे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी कोणत्या वर्णमालेप्रमाणे करण्यात यावी याबाबत संभ्रमावस्था असल्यामुळे काही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाकडे मार्गदर्शन मागवले आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने दिनांक ७.५.२०१८ रोजी मराठी वापराबाबतचे शासन परिपत्रक निर्गमीत केले असून त्याप्रमाणे दैनंदिन व्यवहारामध्ये व सर्व शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर करणे बंधनकारक केलेले आहे. त्याशिवाय उपरोक्त नियम २९ (१) मध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी मराठीत तयार करणे बाबत स्पष्ट तरतुद आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) नुसार निवडणूका सुरळीतपणे पार पाडणेसाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेश/ निदेश देणे बाबतचे अधिकार प्राधिकरणाकडे निहित केलेले आहेत. सदर अधिकाराचा वापर करुन प्राधिकरण पुढील प्रमाणे आदेश/निदेश देत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २९ (१) मधील नमुना ८ मध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करतांना मराठी वर्णमालेचा वापर करावा. सदरची बाब आपल्या अधिनस्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून उमेदवारांची यादी प्रसिध्द करतांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार.**

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).

[Type text]



SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA
Scanned with CamScanner